RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR
6.20

ISSN 0976-0377

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Issue : XXVII, Vol. III**
**Year - 14 (Half Yearly)**
**(Jan. 2023 To June 2023)**

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

Price: ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. S.D. Sindkhedkar**
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

**Ambuja N. Malkhedkar**
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue:XXVII,Vol.III,Jan. 2023 To June 2023

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Retail Banking in India : An Overview<br>**Dr. H. Srinivas Rao** | 1 |
| 2 | E-commerce and Indian Economy<br>**Dr. Nagnath M. Adate** | 9 |
| 3 | Globalization and Higher Education : Challenges and Advantage<br>**Dr. Nilam Chhangani** | 15 |
| 4 | Comparative Study of Health Index in Nanded City and Nanded District Rural College's<br>**Dr. P. N. Deshmukh** | 22 |
| 5 | रीरिकालीन कवियों का नारी विषयक दृष्टीकोण<br>**डॉ. शैलेंद्रकुमार शुक्ल** | 31 |
| 6 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यांतरे<br>**डॉ. बालाजी ग्यानोबा कांबळे** | 35 |
| 7 | पंतप्रधान पिक विमा योजना शेतकऱ्यांना वरदान<br>**डॉ. दयाळु किसन राठोड** | 44 |
| 8 | मराठवाडयातील पर्यटनाचा अभ्यास<br>**डॉ. टी. एस. बिडवे** | 52 |
| 9 | मृद संधारण विभागामध्ये शासनाची भुमिका<br>**मुक्तेश्वर सुरेशराव घोटे** | 59 |
| 10 | भारत युक्रेन संबंधाचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**डॉ.संतोष गुणवंतराव पाटील** | 64 |

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XXVII, Vol. III, Jan. 2023 To June 2023 

# भारत युक्रेन संबंधाचा विश्लेषणात्मक अभ्यास

**डॉ.संतोष गुणवंतराव पाटील**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय,
लातूर, जि. लातूर

10 **Research Paper - Political Science**

**प्रस्तावणा :-**

सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर, भारताने डिसेंबर १९९१ मध्ये युक्रेनला सार्वभौम देश म्हणून मान्यता दिली आणि जानेवारी १९९२ मध्ये राजकीय संबंध प्रस्थापित केले.युक्रेनची राजधानी कीव मध्ये भारतीय दूतावास १९९२ मध्ये उघडण्यात आले आणि युक्रेनने फेब्रुवारी १९९३ मध्ये नवी दिल्ली येथे दूतावास उघडले. हा त्यांचा आशियातील पहिला उच्चायुक्त होता. दोन्ही देशांमध्ये १७ द्विपक्षीय संबंधांवर स्वाक्ष?याही झाल्या आणि युक्रेन भारताचा व्यापारी भागीदार बनला. औषध निर्मिती क्षेत्रातील युक्रेन हा भारताचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे.

युक्रेनने भारताकडून लष्करी उपकरणे घेण्याची तयारी दाखवली आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये भारताचे चांगले स्थान निर्माण झाले आहे आंतरराष्ट्रीय संरक्षण बाजारपेठेत भारताचे अस्तित्व वाढले आहे. हे भारतीय संरक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि आत्मनिर्भर भारताचे लक्षण आहे. यावरून भारत संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनल्याचे सिद्ध होते. युक्रेनने USD ७० दशलक्ष किंमतीच्या चार करारांवर स्वाक्षरी केली.

रशिया-युक्रेन युद्धात भारताच्या संतुलित दृष्टिकोनाचा परिणाम काय होईल आणि चीनच्या संदर्भात भारताच्या सुरक्षा आणि भू-राजकीय हितसंबंधांवर त्याचा काय परिणाम होईल?रशिया-युक्रेन युद्धात भारताने तटस्थतेचे धोरण अवलंबले. भारताच्या या धोरणामुळे अमेरिकेसह पाश्चात्य देशांनी भारतावर रशियाकडे झुकत असल्याचा आरोप केला. अशा परिस्थितीत भारत आणि युक्रेनचे संबंध कसे राहिले आहेत असा प्रश्न आपल्या मनामध्ये उपस्थित होतो.

अमेरिका आणि पाश्चात्य देशांनी संयुक्त राष्ट्रात रशियाच्या विरोधात मतदानात भाग घेतला. अमेरिकेने रशियाला आक्रमक मानले. अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांसोबत भारतानेही यावे, असा दबाव अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांकडून होता. मात्र, या दबावाला बगल देत

भारताने रशियासोबतचे धोरणात्मक आणि आर्थिक संबंध मजबूत केले. अशा परिस्थितीत भारताचे युक्रेनसोबतचे संबंध कसे आहेत ते जाणून घेणे गरजेचे आहे.

युक्रेन संकटावर भारताचा प्रतिसाद अनिर्णय आहे का? नाही. भारताने स्पष्टपणे कोणत्याही बाजूचे समर्थन केले असते तर त्याला नकाराला सामोरे जावे लागले असते. पण एक उगवती शक्ती म्हणून भारताच्या किमान अपेक्षांशी वाद घालणे त्रासदायक ठरणार आहे. आजच्या काळात, पूर्वीच्या विपरीत, संकटाभोवती मुत्सद्देगिरी ठरवण्यात भारताची भूमिका वाढली आहे.

रशियाने भारताच्या मागणीकडे लक्ष दिले आणि सुमारे २२,५०० भारतीय नागरिकांना (युक्रेनमध्ये शिकणारे २४ टक्के आंतरराष्ट्रीय विद्यार्थी भारतीय होते) परत आणण्याची सोय केली. या संकटावर भारताचा मुत्सद्दी आणि तार्किक प्रतिसाद जगाने शांतपणे स्वीकारला. आता भारतीय विद्यार्थी त्यांच्या देशात सुखरूप परतले असल्याने भारतीय मुत्सद्देगिरीचा हा टप्पा पूर्ण झाला आहे.

**संशोधनाचे गृहीत:-**

१) रशिया-युक्रेन युद्धात भारताच्या संतुलित दृष्टीकोन आहे.

२) युक्रेनमध्ये भारताचा निर्यात मोठ्या प्रमाणात आहे.

३) आंतरराष्ट्रीय पातळीवर मुत्सद्देगिरी ठरवण्यात भारताची भूमिका वाढली आहे.

४) आंतरराष्ट्रीय संरक्षण बाजारपेठेत भारताचे अस्तित्व वाढले आहे.

**संशोधनाचे महत्त्व :-**

भारत युक्रेन संबंधाचा विश्लेषणात्मक अभ्यास करून ते संशोधन पत्रिकेत प्रकाशित केले जाणार आहे. प्रकाशित झालेला संशोधन लेख समाजातील अनेक लोक त्याचे वाचन करतील. समाजाला भारत युक्रेन संबंधाची वास्तविक माहिती मिळेल. सरकारला परराष्ट्र धोरण ठरवताना सदरील संशोधन मार्गदर्शक ठरेल. माझ्या नंतर भारत युक्रेन संबंधाचा अभ्यास करणा?यांना संशोधक अभ्यासकाला यांचा फायदा होईल असे मला वाटते.

**संशोधनाचा उद्देश :-**

१) भारत युक्रेन संबंधाचा अभ्यास करणे.

२) रशिया युक्रेन युद्धाचा आढावा घेणे.

३) संयुक्त राष्ट्र संघातील युक्रेन च्या भूमिकेचा अभ्यास करणे.

४) भारतातून युक्रेन केलेल्या निर्यातीचे अध्ययन करणे.

५) भारत युक्रेन मध्ये झालेल्या कराराचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धत:-**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक व विश्लेशानात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. विश्लेषण करताना ग्रंथालयीन साहित्याचा, वर्तमानपत्राचा व निवडक महत्वपूर्ण

लेखांचा वापर करण्यात येणार आहे. तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जातो. दुय्यम स्त्रोतामध्ये शासनाद्वारे प्रकाशित अहवाल, संदर्भ ग्रंथ, संशोधनपत्रिका, संकेत स्थळ, वृत्तपत्र व मासिके यांचा आधार घेण्यात येणार आहे. भारत युक्रेन संबंधाचा अभ्यास प्रामुख्याने विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीने करून संशोधनाची उद्दिष्ट साध्य झाले आहेत.

**संशोधनाची व्याप्ती :-**

भारत युक्रेन संबंधाचे विश्लेषणात्मक करताना राजकीय, सांस्कृतिक, व्यापारी व संरक्षण विषयक सबंधांचा विचार केला जात आहे. भारत आणि युक्रेनमध्ये कधी मैत्रीपूर्ण तर कधी विरोधी संबंध राहिले आहेत.या संबधाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे.२०२२ पासून रशिया व युक्रेन यांच्यांत युद्ध चालू आहे.भारताने संतुलित भूमिका घेतली आहे.

**भारत-युक्रेन संबंधः**

युक्रेन सोव्हिएत संघाचा युनियनचा प्रजासत्ताक भाग असतानाही भारताचे युक्रेनशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. दरवर्षी परराष्ट्र कार्यालयात सल्लामसलत करण्यासाठी सचिव स्तरावर बैठकीचे आयोजित केली जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर युक्रेन भारताला सकारात्मक सहकार्य करत आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्या द्विपक्षीय सिमला कराराच्या आधारे जम्मू आणि काश्मीरच्या समस्येच्या निराकरणाला युक्रेनचा पाठिंबा होता. युक्रेन संयुक्त राष्ट्रांच्या संरचनेतील सुधारणांनाही भारताच्या बाजूने पाठिंबा देतो. परुंतु २०२२ च्या युक्रेन-रशिया युद्धामध्ये भारताने तटस्थ भूमिका घेतली आहे, १९९८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अणुचाचणी केली तेव्हा युक्रेन निःशस्त्रीकरण परिषदेचा सदस्य होता त्यावेळी युक्रेनच्या संयुक्त राष्ट्रातील स्थायी प्रतिनिधी मायकोला माईमेस्कुल यांनी भारताच्या अण्वस्त्र चाचणीचा निषेध केला होता. परंतु भारत सरकारने स्वतःच्या संरक्षणासाठी ही चाचणी घेतल्याचे सांगितले होते. भारताने आणखी अणुचाचण्या करु नये या संयुक्त राष्ट्रांच्या.ठरावाला युक्रेनने ही पाठिंबा दिला होता. युक्रेन पाकिस्तानला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करत आहे. युक्रेन आणि पाकिस्तान यांच्यातील संरक्षण करारांना मोठा इतिहास आहे. युक्रेन पाकिस्तानला सर्वाधिक शस्त्रास्त्रे पुरवतो.पाकिस्तान आणि युक्रेनमध्ये शस्त्रास्त्रांसाठी १.६ अब्ज अरब डॉलर संरक्षण करार झाला आहे. पाकिस्तान लष्करात समाविष्ट असलेला T-८० रणगाडा युक्रेनमध्ये बनवला आहे. २०१७ मध्ये, दोन्ही देशांनी त्या द्विपक्षीय करारावर स्वाक्षरी केली होती, ज्यामध्ये T-८० रणगाड्याची अपग्रेड केलेली आवृत्ती विकत घेण्याचा उल्लेख होता. दहशतवादाच्या बावतीत युक्रेन अनेकदा पाकिस्तानच्या बाजूने उभा राहिला आहे. भारतानेही अनेकवेळा धोकादायक शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यावर आक्षेप घेतला आहे, मात्र युक्रेनने प्रत्येक वेळी भारताच्या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. काश्मीरमधील पाकिस्तान समर्थित

दहशतवादाचे प्रकरण असो किंवा पाकिस्तानातील दहशतवाद्यांना दिलेली मदत असो याबाबत युक्रेनने भारताला कधीही पाठिंबा दिला नाही.

परंतू आज संघर्षात भारताने युक्रेनला मदत करावी असे वाटत आहे.भारतातील युक्रेनच्या राजदूताने पंतप्रधान मोदींच्या हस्तक्षेपाची मागणी केली. हा तणाव कमी करण्यासाठी भारताची युक्रेनला खूप मदत होऊ शकते असे युक्रेनच्या राजदूताने म्हटले आहे. याशिवाय रशियाच्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी अमेरिका भारतावर दबाव आणत आहे. रशिया युक्रेन युद्धात भारताने युक्रेन सहकार्य करावे अशी अमेरिका आणि पाश्चात्य देशांची इच्छा आहे. पण आजपर्यंत या देशांनी दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताला कोणतेही सहकार्य दिलेले नाही, हा एक मोठा प्रश्न आहे. काश्मीर मुद्यावर काहीही केले नाही. चीनने गालवानमध्ये हल्ला केला, तेव्हाही हे देश भारताच्या मदतीला आले नाहीत. मग आज भारताने या देशांना समर्थन का द्यावे? असा प्रश्न भारतीयांना पडला आहे.

देशभरात ३० पेक्षा जास्त युक्रेनियन सांस्कृतिक संघटना/गट पसरलेले आहेत. ते भारतीय नृत्यांना प्रोत्साहन देण्यात गुंतलेले आहे. युक्रेनमध्ये भारतीय समुदाय मोठ्या प्रमाणात राहतात ज्यामध्ये बहुतांश व्यावसायिक आणि विद्यार्थी आहेत. युक्रेनमध्ये १८,००० भारतीय विद्यार्थी प्रामुख्याने वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेत आहेत. भारतीय व्यावसायिक प्रामुख्याने फार्मास्युटिकल्स, आयटी, अभियांत्रिकी, औषध आणि शिक्षण या क्षेत्रात काम करतात. यामुळे दोन देशात विविध क्षेत्रामध्ये सामंजस्य करार झाले आहेत. २००१ मध्ये भारतीय प्रवासींनी स्थापन केलेला 'इंडिया क्लब' युक्रेनमधील भारतीय निवासी लोकांना सक्रियपणे गुंतवून ठेवतो आणि अनेक कार्यक्रम आयोजित करतो जसे की दिवाळी सण, क्रिकेट स्पर्धा, होळी सण, भारतीय नृत्य महोत्सव, बॉलीवूड चित्रपटांचे प्रदर्शन इ .उल्लेख करता येतो.

भारताला स्वातंर्त्य मिळाल्या पासून युक्रेनसाठी लष्करी तंत्रज्ञान आणि उपकरणे उपलब्ध आहेत आर-?? हे हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे युक्रेन तयार करते IAF (इंडियन एअर फोर्स) द्वारे त्याच्या SU-३०MKI लढाऊ विमानांवर. आता दोन्ही देशांमधील संरक्षण वाढवण्यासाठी भारत युक्रेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करून सहकार्य वाढवत आहे भारत आणि युक्रेन मध्ये १७ हून अधिक द्विपक्षीय करारांवर झाले आहेत. या करारामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान, संशोधनात सहकार्य, आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारा करारांचा समावेश आहे. एरो इंडिया २०२१ दरम्यान युक्रेनने भारतासोबत ? ५३० कोटी किमतीचे चार करार केले ज्यात नवीन शस्त्रास्त्रांची विक्री तसेच भारतीय सशस्त्र दलांच्या सध्या सेवेत असलेला शस्त्रांची देखभाल आणि सुधारणा यांचा समावेश आहे.यामुळे संरक्षण क्षेत्राला मजबुती भेटणार आहे. भारतातून अनेक महत्वपूर्ण वस्तूंची निर्यात युक्रेनमध्य होते.

**आशिया-**

पॅसिफिकमधील युक्रेन हे सर्वात मोठे पाचव्या क्रमांकाचे राष्ट्र आहे. युक्रेनला होणाऱ्या निर्यातीतील बहुतांश भाग फार्मास्युटिकल्सचा आहे. भारत-युक्रेन व्यापारी संबंध दोन्ही देशांमधील दीर्घकालीन मैत्रीच्या आधारावर विकसित झाले आहेत. मार्च १९९२ मध्ये भारत आणि युक्रेन यांच्यात मैत्री आणि सहकार्य करारावर स्वाक्षरी झाली, तेव्हापासून भारत-युक्रेन व्यापार संबंधांना मोठी चालना मिळाली. यामुळे उभय देश अतिशय वेगाने विकसित होत आहेत. दरम्यान भारत युक्रेन व्यापारात तिपटीने वाढ झाली आहे आणि ती US$१ अब्ज पेक्षा जास्त झाली आहे.

युक्रेनद्वारे भारतातून आयात केल्या जाणाऱ्या मुख्य वस्तू म्हणजे औषधे, औषधी उत्पादन, धातू आणि खनिजे, तंबाखू उत्पादने, चहा, कॉफी, मसाले, रेशीम आणि ताग तसेच युक्रेनमधून भारताने आयात केलेल्या मुख्य वस्तू रसायने, उपकरणे, मशीन आणि इंजिने आहेत. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार गेल्या २५ वर्षांत लक्षणीय वाढला आहे. २०१८-१९ मध्ये जवळजवळ US$२.८ अब्ज होता. भारत हे आशिया- पॅसिफिक मधील युक्रेनचे सर्वात मोठे निर्यात गंतव्यस्थान आहे. दोन्ही देशात संयुक्त व्यवसाय परिषदेची बैठक आयोजित करतात. यामुळे भारत युक्रेन व्यापार संबंधांना मोठी चालना मिळाली आहे. युक्रेन हा भारतीय उद्योगात नवीन सदस्य नाही कारण त्याचे उद्योग सक्रियपणे गुंतलेले आहेत आणि ते भारतीय ऊर्जा क्षेत्र आणि इतर जड उद्योगांचा कणा आहे.वैद्यकीय क्षेत्रात लागणारे ऑक्सिजन कन्व्हर्टर उपकरणे पुरवणारे प्लांट देखील युक्रेन मध्ये आहेत यामुळे याची भारताला मोठी मदत झाली आहे. भारत-युक्रेन व्यापारी संबंधही दोन्ही देशांमधील तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक क्षेत्रात आदाण प्रदान करून सहकार्य वाढवण्यात यशस्वी ठरले आहेत.

भारत आणि युक्रेन यांच्यात मे १९९२ मध्ये झालेल्या विविध करारानुसार, प्रकल्पांची अंमलबजावणी, प्रदर्शने आयोजित करणे आणि वैज्ञानिक संशोधनात सहकार्य यावर चर्चा करण्यासाठी दोन्ही देशात संयुक्त समिती दरवर्षी बैठक घेते आणि अंमलबजावणीसाठी विविध प्रकल्पांना मंजुरी दिली. नवी दिल्ली येथे विज्ञान तंत्रज्ञान दिवस आयोजित करण्यात आला होता. युक्रेनची राष्ट्रीय अंतराळ संस्था आणि इस्रो यांचे अंतराळ क्षेत्रात सतत सहकार्य चालू आहे. भारताने युक्रेन सोबत अंतराळ क्षेत्रात विविध मोहिमा मध्ये एकत्र काम केले आहे. युक्रेनमध्ये आयटी क्षेत्र खूप मजबूत आहे. यातून भारतातामधील संस्थांसाठी IT कार्यक्रम आयोजित करण्यासाठी करारावर स्वाक्षरी केलीआहे. यातून आय. टी. क्षेत्रामध्ये आधुनिक माहिती मिळवुन बरीच प्रगती होणार आहे. याबरोबरच बायो-टेक्नॉलॉजी हे अद्ययावत क्षेत्र आहे. जिथे बायोकॉन ,जीनोम इत्यादी कंपन्या एकमेकांशी सहकार्य करत आहेत. हे थर्मल , जलविद्युत आणि अणुऊर्जा प्रकल्पांसाठी भारताला टर्बाइन देखील पुरवते. रशिया आणि युक्रेनमधील मतभेदाचे रूपांतर युद्धात झाले आहे. २०१४ ला क्रिमियन द्वीपकल्प मॉस्कोने जोडल्यामुळे तसेच युक्रेन जून २०२० नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (NATO)

इंटरऑपरेबिलिटी पार्टनरशिप अंतर्गत 'एन्हांस्ड अपॉर्च्युनिटी पार्टनर (EOP)' बनल्यामुळे, युक्रेनने युरोपियन युनियन आणि नाटोचे सदस्यत्त्व मिळवल्यामुळे रशिया आणि युक्रेनमधील संबंध बिघडले, ज्यामुळे भारतासाठी संभाव्य कोंडी निर्माण झाली. रशियाने उत्पादित केलेल्या आणि युक्रेनला विकलेल्या लष्करी उपकरणांच्या पुनर्वापरावर आक्षेप घेतला. युक्रेनसोबत व्यापार करणाऱ्यांवर रशियाने आक्षेप घेण्यास सुरुवात केली आहे.रशियाने उत्पादित केलेल्या आणि युक्रेनला विकलेल्या लष्करी उपकरणांच्या पुनर्वापरावर आक्षेप घेतला. युक्रेनसोबत व्यापार करणाऱ्यांवर रशियाने आक्षेप घेण्यास सुरुवात केली आहे. भारतीय वायुसेना (IAF) सध्या युक्रेनशी त्यांच्या AN-३२ चा ताफा पुन्हा वाटप करण्यासाठी सहयोग करत आहे. यामुळे भारत रशियातील संबंधाला तडा जाण्याची शक्यता आहे हे एक भारत समोरील आव्हान आहे.

## संदर्भ सूची :-

१) डॉ. बी एल फाडिया - आंतरराष्ट्रीय राजनीती - साहित्य भवन पुब्लिकेशन, आगरा
२) चंद्रशेखर सूद निरंजना बहुगुणा -आंतरराष्ट्रीय राजनीती - राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली
३) दैनिक जागरण RAMESH MISHRA Publish Date: Fri, १९ Aug २०२२
४) https://en.wikipedia.org
५) https://www.orfonline.org/hindi